महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र. तशि प्र १२२६/प्र क्र ७/प्रवेश प्रक्रिया/२०२६/२०६१ **दिनांक २१/०८/२०२६**

जाहीर सूचना

तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील व CAP फेऱ्यांनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना

- महाविद्यालयांनी माहिती पुस्तिकेतील नियम १३ (Rule 13) नुसारच संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे.
- संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया सर्व CAP फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच आणि अर्जदारांच्या 'Inter-Se-Merit'नुसार करण्यात यावी.
- महाविद्यालयांनी संस्थास्तरावरील प्रवेशाचे नियम, प्रक्रिया व माहिती पुस्तिका (Prospectus) आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- इच्छुक उमेदवार संबंधित महाविद्यालयात थेट अर्ज करू शकतात. तसेच, थेट अर्ज करणे शक्य नसल्यास उमेदवार आपल्या CAP पोर्टल लॉगिनद्वारे संस्थास्तरावरील 'Option Form' भरू शकतात.
- संस्थास्तरावरील प्रवेशासाठी प्राप्त अर्ज तसेच CET कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली विद्यार्थ्यांची यादी विचारात घेऊन महाविद्यालयाने अधिकृत गुणवत्ता यादी (Merit List) तयार करून ती नोटीस बोर्डावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्यांचा संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित झाल्यानंतर महाविद्यालयाने त्याची नोंद CAP पोर्टलवर तात्काळ करणे बंधनकारक आहे.
- CAP फेऱ्या पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही एजंट, मध्यस्थ किंवा जागा मिळवून देण्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या आमिषाला विद्यार्थी व पालकांनी बळी पडू नये.
- सोशल मीडिया लिंक, एजंट किंवा खाजगी समुपदेशकांमार्फत प्रसारित होणाऱ्या खोट्या व दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहावे.
- कोणत्याही अफवा किंवा अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये. प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती फक्त CET कक्षाच्या अथवा संबंधित संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच तपासावी.

प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता, गुणवत्ता व नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांनी वरील सूचनांचे पालन करावे.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई